महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८७ वे | दिनांक : २०/०३/२०२६ | वार : शुक्रवार

## रुपाली चाकणकरांना तात्काळ पदावरून दूर करा नसता मंत्रालयासमोर उपोषण : करुणा मुंडेंची आक्रमक भूमिका



**मुंबई :** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणामुळे राज्यातील राजकारण तापले असताना आता या प्रकरणाला तीव्र वळण मिळाले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत असतानाच करुणा मुंडे यांनी थेट आंदोलनाचा इशारा दिला आहे. चाकणकर यांना तात्काळ पदावरून दूर केले नाही, तर मंत्रालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचा स्पष्ट इशारा मुंडे यांनी दिल्याने राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले आहे.करुणा मुंडे यांनी चाकणकर यांच्यावर गंभीर आरोप करत म्हटले की, बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तींशी संबंध ठेवणे आणि त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे हे महिला आयोगाच्या अध्यक्षपदाला अजिबात शोभणारे नाही. चाकणकर यांच्या भूमिकेमुळे राज्यातील महिलांना न्याय मिळत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. अशा संवेदनशील पदावर असलेल्या व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखली पाहिजे, अन्यथा सरकारने तातडीने कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

दरम्यान, या प्रकरणात मुंडे यांनी केवळ चाकणकर यांच्यावरच नव्हे, तर इतर राजकीय मुद्द्यांवरही भाष्य केले. भाजपच्या खासदार कंगना रनौत यांनी राहुल गांधींवर केलेल्या टीकेला उत्तर देताना मुंडे यांनी त्यांच्यावरही जोरदार टीका केली. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींनी जबाबदारीने वक्तव्य करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नाशिकमधील तथाकथित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. मात्र, त्याच्या पाद्यपूजेचा फोटो समोर आल्यानंतर रुपाली चाकणकर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणात माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनीही आक्रमक भूमिका घेत चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच संजय राऊत यांनीही त्यांच्यावर टीका करत प्रश्न उपस्थित केले आहेत. दुसरीकडे, मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मात्र चाकणकर यांची बाजू घेतल्याचे दिसून येते, तर रुपाली पाटील ठोंबरे यांनीही राजीनाम्याची मागणी केली आहे.

या प्रकरणात आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनीही गंभीर आरोप केले आहेत. वर्षभरापूर्वीच या प्रकरणाची तक्रार महिला आयोगाकडे देण्यात आली होती, मात्र कारवाई आरोपीवर न होता बातमी प्रसिद्ध करणाऱ्यांवरच करण्यात आली, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अशोक खरात प्रकरणामुळे राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, सरकार आता काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराज भोंदू की चांगले, हे आम्हाला कसे कळणार? दत्तात्रय भरणे

**मुंबई :** नाशिकमधील 'कॅप्टन' अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर विरोधकांकडून टीकेची झोड उठवली जात असताना, राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे त्यांच्या मदतीला धावून आले आहेत. "कार्यक्रमाच्या निमित्ताने कुणी दर्शनाला गेले किंवा कुणासोबत फोटो काढला, तर त्यात त्या व्यक्तीचा काय दोष? महाराज भोंदू आहेत की चांगले, हे आम्हाला कसे कळणार?" असा सवाल उपस्थित करत दत्तात्रय भरणे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची पाठराखण केली. तसेच, बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन करत त्यांनी विरोधकांना सूचक इशाराही दिला आहे.

एका महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याला पोलिसांनी काल अटक केली. खरातच्या अटकेनंतर त्याची पाद्यपूजा करतानाचा रूपाली चाकणकर यांचा व्हिडिओ समोर आला. तसेच रूपाली चाकणकर या अशोक खरात याच्या संस्थेच्या संचालक मंडळावर देखील आहेत. यामुळे रूपाली चाकणकर अडचणीत आल्या आहेत. विरोधकांकडून त्यांच्यावर टीका होत असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी चाकणकरांची बाजू घेतली आहे.

अशोक खरात प्रकरणात रूपाली चाकणकर यांचे नाव आल्यानंतर याबाबत दत्तात्रय भरणे यांना विचारले असता ते म्हणाले, "सार्वजनिक जीवनात काम करताना आम्ही अनेकदा स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या आग्रहाखातर विविध ठिकाणी जात असतो. समजा, एखाद्या गावी गेल्यानंतर तिथल्या सरपंचाने विनंती केली की, 'इथे महाराज आहेत, दर्शनाला जाऊया', तर आम्ही श्रद्धेपोटी तिथे जातो. आता ते महाराज चांगले आहेत की तुमच्या भाषेत 'भोंदू', हे आम्हाला कसे कळणार? आम्ही स्वतःहून तिथे गेलेलो नसतो. त्यामुळे केवळ भेटीवरून किंवा फोटोवरून रूपाली चाकणकर यांना दोषी धरणे पूर्णपणे चुकीचे आहे."अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा जागेसाठी सुनेत्रा पवार यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. या पार्श्वभूमीवर दत्तात्रय भरणे यांनी ही निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन विरोधकांना केले. "अजितदादांचे नाव आजही घेतले की लोकांच्या डोळ्यात पाणी येते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी निवडणूक लढवत आहेत, अशा वेळी सर्वांनी एकत्र येऊन वहिनींना पाठिंबा दिला पाहिजे. ही निवडणूक बिनविरोध करणे हीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल," असे भरणे भावनाविवश होऊन म्हणाले.कॉंग्रेसने बारामतीत उमेदवार देण्याचे संकेत दिल्याबाबत विचारले असता, दत्तात्रय भरणे यांनी आक्रमक पवित्रा घेतला. "कोणी स्वतःच्या हवसेपोटी किंवा चुकीच्या निर्णयामुळे सुनेत्रा वहिनींच्या विरोधात उभे राहिले, तर त्यांची काय अवस्था होईल, हे मला वेगळ्याने सांगण्याची गरज नाही. बारामतीची जनता दादांच्या कामाची पावती नक्कीच देईल," अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना निवडणुकीच्या रिंगणात न उतरण्याचा सल्ला दिला.

## संभाजीनगर सेनेतील गटबाजीने अध्यक्षपद भाजपकडे : अध्यक्षपदी अविनाश गलांडे तर उपाध्यक्षपदी जितेंद्र जैस्वाल यांची बिनविरोध निवड



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या (मिनी मंत्रालय) अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने पुन्हा एकदा बाजी मारली आहे. भाजपच्या या विजयाचे मुख्य शिल्पकार ठरलेले राज्याचे बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी महानगरपालिकेपाठोपाठ आता जिल्हा परिषदेतही आपला राजकीय दबदबा सिद्ध केला आहे. दुसरीकडे, शिवसेनेचे खासदार संदिपान भुमरे यांचे पुतणेप्रेम आणि आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुत्रप्रेमामुळे शिवसेनेला हातची सत्ता गमवावी लागली आहे. या निकालामुळे जिल्ह्यात भाजपची पकड आता अधिक मजबूत झाली आहे. भाजपच्या भविष्यातील वाटचालीसाठी जिल्हा परिषदेची सत्ता नांदी ठरणार आहे.

भाजप आणि शिवसेनेची महापालिका निवडणुकीत युती तुटली आणि भाजपला अभूतपूर्व यश मिळाले. प्रत्येक वेळी लहान भाऊ म्हणून भूमिका बजावणारा भाजप मोठा झालेला शिवसेनेला अद्याप रुचेनासा झाला आहे. शिवाय युती करण्यावरून शिवसेनेमधील अंतर्गत राजकारणही कारणीभूत ठरत आहे. महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेची युती तुटल्यानंतर भाजपने अभूतपूर्व यश मिळवले होते. प्रत्येक वेळी छोटा भाऊ म्हणून भूमिका बजावणारा भाजप आता मोठा झाल्याचे शिवसेनेला पचनी पडत नसल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत सुरुवातीला युतीची घोषणा झाली होती. मात्र सिल्लोडमध्ये आमदार सत्तारांनी युती तोडली आणि नंतर संपूर्ण जिल्ह्यात शिवसेनेने सर्व जागांवर आपले बी फॉर्म दिल्याने भाजपची अडचण झाली. शिवसेनेची ही खेळी मंत्री अतुल सावे यांच्या वेळीच लक्षात आली. शिवसेनेला रोखण्यासाठी सावे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार सतीश चव्हाण यांच्याशी संधान बांधले आणि राष्ट्रवादीचे 4 सदस्य आपल्या बाजूने वळवले. कॉंग्रेसच्या एकमेव सदस्याला पक्षात प्रवेश देऊन ताकद वाढवली. यामुळे भाजपचे 23 सदस्य, दोन पुरस्कृत, एक कॉंग्रेस आणि एक प्रहार असे एकूण 27 सदस्यांचे पाठबळ उभे राहिले. दुसरीकडे, उद्धवसेनेचे सर्व सदस्य मतदानाला गैरहजर राहिले. याचा थेट फायदा भाजपला झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० मार्च २०२६


## भावनांच्या गाभाऱ्यात नेणारा काव्यसंग्रह-पारखं झालं गाव



"पारखं झालं गाव" हा कवी ज्ञानेश्वर गायके यांचा कवितासंग्रह वाचनाचा सुदैवी योग आला आणि त्या अनुभवाने मन अक्षरशः समृद्ध झाले. या संग्रहातील कविता आशय, रचना आणि भावविश्व या तिन्ही अंगांनी अत्यंत प्रभावी ठरतात. कवीने शब्दांना दिलेली साज, प्रतिमांची उभारणी आणि भावनांची सहज अभिव्यक्ती वाचकाला अंतर्मुख करून जाते.'काळजाचं सोनं' या कवितेत कवीने आपल्या मुलीचे केलेले कोमल आणि जिव्हाळ्याचे वर्णन मनाला स्पर्शून जाते. त्याचप्रमाणे 'निळ्या निळ्या आभाळाचे', 'गौताळाच्या जंगलात', 'माय गेली माया गेली', 'अरे पावसा पावसा', 'रडे आज लोकशाही', 'ठेव पेटती मशाल', 'किती किती छान', 'नको टांगू रे फासाला', 'हरवलं गाव' या कविता विशेषत्वाने मनात घर करून राहतात. या कवितांमधून ग्रामीण जीवन, सामाजिक जाण, निसर्गप्रेम आणि मानवी संवेदना यांचे विविध पैलू प्रभावीपणे उलगडतात.या संग्रहाला प्रास्ताविक प्रसिद्ध लेखक डॉ. अंबादास सगट यांनी लाभले असून, नामांकित कवी पी.विठ्ठल यांनी व्यक्त केलेले अभिप्राय या काव्यनिर्मितीची साहित्यिक उंची अधोरेखित करतात. तसेच, या संग्रहाच्या निर्मितीमागे डॉ. शिवाजी हुसे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. एकंदरीत, 'पारखं झालं गाव' हा कवितासंग्रह वाचकाच्या मनात भावनांची नाजूक हालचाल निर्माण करणारा, विचारांना चालना देणारा आणि काव्यरसिकांना समाधान देणारा ठरतो. कवी ज्ञानेश्वर गायके यांना त्यांच्या पुढील साहित्य निर्मितीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

**प्रा. अशोक दुधकर, कन्नड**

## स. भु. ला. वर्धापन दिनी दरवर्षी ज्ञानप्रकाश मोदाणींतर्फे तहहयात देणगी



**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेच्या १११ व्या वर्धापनदिनी स.भु. प्रशाला शालेय समितीचे अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदाणी यांनी संस्थेला रु. पंचवीस हजार कृतज्ञता भेट म्हणून दिले. मागील वर्षीही त्यांनी इतकीच देणगी दिली आणि तहहयात दरवर्षी वर्धापनदिनी २५ हजार रुपये देणार असल्याचे जाहीर केले. त्यांनी संस्थेचे अध्यक्ष दिनेश वकील आणि सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांच्याकडे सदर धनादेश सुपर्द केला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष बी. वाय.क्षीरसागर, सहचिटणीस डॉक्टर रश्मी बोरीकर , उल्हास शिऊरकर, रामेश्वर तोतला, प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, रमेश जोशी, प्रमोद जोशी आणि अन्य संस्था पदाधिकारी आणि शिक्षक शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगरच्या स.भु. प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासविषयक विविध उपक्रमांसाठी सदर रक्कम देत असल्याचे मोदाणी यांनी सांगितले. आपल्या कुटुंबातील तीन पिढ्यांनी २७ सदस्यांनी स. भु.आणि शारदा मंदिरच्या ज्ञानतीर्थात इ.स.१९३६ ते २००३ या कालखंडात शिक्षण घेतले, परिवारातर्फे ही कृतज्ञता भेट दरवर्षी वर्धापन दिनी देणार असल्याचे ते म्हणाले. ज्ञानप्रकाश मोदाणी हे सर्वोदयी विचारवंत असून ते महात्मा गांधी,आचार्य विनोबा भावे,साने गुरुजी, बाळासाहेब भारदे यांच्या विचारांनी प्रेरित राहून चिकाटीने कार्यरत आहेत. ज्या शाळेने आपले जीवन घडविले त्या शाळेप्रति प्रत्येक विद्यार्थ्याने कृतज्ञ राहिले पाहिजे, असेही ते म्हणाले. मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांनी सदर देणगीबद्दल प्रशालेच्या वतीने त्यांचे आभार मानले.

## केंद्रीय विद्यालयात शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी प्रवेश वेळापत्रक जाहीर

**नाशिक (प्रतिनिधी) :** केंद्रीय विद्यालय संगठन, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक सत्र २०२६–२७ साठी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकात विविध वर्गांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या तारखा आणि सूचनांचा समावेश आहे. बालवाटिका-१ व ३ तसेच इयत्ता १ ली साठी ऑनलाइन नोंदणी २० मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून सुरू होणार आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २ एप्रिल २०२६ आहे. बालवाटिका -१, २ व ३ ची प्रथम तात्पुरती यादी ८ एप्रिल आणि इयत्ता १ ली ची ९ एप्रिल रोजी जाहीर केली जाईल. जागा उपलब्ध असल्यास दुसरी आणि तिसरी यादी अनुक्रमे १६ एप्रिल आणि २१ एप्रिल रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती पीएमश्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्पचे प्राचार्य गजराज मीना यांनी दिली. ते पुढे म्हणाले की प्रवेश प्रक्रिया निर्धारित प्राधान्यक्रमानुसार होईल, ज्यामध्ये आरटीई , सेवा श्रेणी आणि आरक्षण नियमांचे पालन केले जाईल. संपूर्ण प्रक्रिया ही पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पार पाडली जाईल, असे त्यांनी नमूद केले. इयत्ता २ री पासून पुढील वर्गांसाठी जागा उपलब्ध असल्यास ऑफलाइन नोंदणी केली जाईल. या वर्गांची यादी १३ एप्रिल २०२६ रोजी जाहीर होईल आणि प्रवेश प्रक्रिया १५ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ दरम्यान पार पडेल. इयत्ता ११ वी वगळता इतर सर्व वर्गांसाठी प्रवेशाची अंतिम तारीख ३० जून २०२६ आहे. जर जागा रिक्त राहिल्या, तर प्रवेश प्रक्रिया ३१ जुलै २०२६ पर्यंत सुरू ठेवली जाईल. इयत्ता ११ वी च्या प्रवेशाबाबत प्राचार्य मीना यांनी सांगितले की केंद्रीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी १० वीच्या बोर्ड निकालानंतर १० दिवसांच्या आत सुरू होईल, तर इतर विद्यार्थ्यांना रिक्त जागांच्या आधारे नंतर संधी दिली जाईल.शेवटी प्राचार्य मीना यांनी पालकांना वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्याचे आणि सर्व आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० मार्च २०२६


## कळ लागता हृदयास

कळ लागता हृदयास,
कवितेचा जन्म होतो.
कळा देता देता बाईचा,
पुनर्जन्म होऊन जातो.

प्रसव वेदनेच्या कळा,
प्राणपणाने झेलते बाई.
बाळाला जन्म देताच,
होऊन जाते ती आई.

मी पाहिले आहे बाईला,
श्वास रोखून कळा देतांना.
बाळाचा जन्म होताच,
बाईचा पुनर्जन्म होतांना.

दु:खाने भरलेले आहे,
सदा स्त्रियांचे जीवन.
प्राणपणाने लढतांना,
जीवन करते ती पावन.

दु:ख सहन करतांना,
बाईची क्षमता दिसते.
संकटांशी संघर्ष करून,
सदा सर्वदा ती हसते.

संकटांशी सामना नित्य,
करतच राहणार आई.
निर्णय घेताना कधीच,
करणार नाही ती घाई.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन


डीप्लोमा गांधी विचार


मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# डॉ तुकाराम वांढरे लिखित दोन ग्रंथांचे २० मार्चला प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर :** शुक्रवार ,दिनांक २० मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता देवगिरी महाविद्यालयाचे संगीत विभागप्रमुख डॉ. तुकाराम वांढरे लिखित पं. विष्णू नारायण भातखंडे सांगीतिक कार्य आणि कर्तृत्व व सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या या दोन ग्रंथांचा प्रकाशन समारंभ देवगिरी महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार श्री सतीश भाऊ चव्हाण साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष- डॉ. दा. धों काचोळे (ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ, विचारवंत) निवृत्त प्राचार्य, शिवछत्रपती महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर हे असतील. यावेळी कविवर्य प्रा. फ. मुं शिंदे, (प्रख्यात कवी, अध्यक्ष , ८७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (सासवड, पुणे.) यांची मुख्य उपस्थिती असणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणूनडॉ. वैशाली संतोष देशमुख, संगीत विभागप्रमुख, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, प्रा.डॉ. कुणाल इंगळे, संगीत विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबईप्रा. राजेश सरकटे, (निर्माता, स्वरविहार, गायक आणि संगीतकार तथामाजी संगीत विभागप्रमुख, देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) यांची उपस्थिती असेल. डॉ तुकाराम वांढरे यांच्या ग्रंथांवर प्रा. डॉ.श्रुती तांबे, (समाजशास्त्रज्ञ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. आणि प्रा डॉ समाधान इंगळे मराठी विभागप्रमुख, र. भ. अट्टल महाविद्यालय गेवराई ,जि.बीड हे भाष्य करणार आहेत. डॉ. रवी पाटील, (प्राचार्य, देवगिरी महाविद्यालय, छत्रपतीसंभाजीनगर )यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे , प्रा.अरुण काटे, प्रा. विजय नलावडे, डॉ .गणेश मोहिते, डॉ.अपर्णा तावरे कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत. संगीत आणि समाजशास्त्र विषयावरील ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. तुकाराम वांढरे आणि मित्रपरिवार तसेच प्रभा प्रकाशन कणकवली यांनी केले आहे.

# दिव्यांगावर मात करून ढोलकीला बोलविनारा कला रत्न आदि. आंबू ठाकर



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** कै.आंबु सयाजी कातोरे जन्म १ जून १९५१ मृत्यू १६ जानेवारी २०१८ रोजी कातोरे वाडी/ देवाचीवाडी/देवठाण ता.अकोले जिल्हा अहील्यानगर मी सुधाकर विठ्ठल मेंगाळ गर्दनीं (चाफेवाडी) येथे सकाळी सकाळी आंघोळ स्नान करून चहापाणी घेऊन माझ्या जुन्या घरी ओट्यावर बसलो आणी कोण जाणे पणं "अंबु सयाजी कातोरे" यांची अचानक आठवण झाली आणि या अवलियाच्या आठवणींना उजाळा मिळाला कारण की, मी शाळेत असताना 1976 - 1977 च्या दरम्यानचा काळ त्यावेळी माझी चित्रकला ( hand drawing) खूप छान होती या ठिकाणी मी माझे कौतुक सांगत नाही परंतु खरोखरच चांगली चित्रकला होती माझ्या त्यावेळच्या पेंटिग बघून मला आठवतेय की मला श्री,चिमां गंगाराम कातोरे मंगा रामा( रामभाऊ) पथवे मोठे वाडी या प्रमुख कलाकारांच्या नेतृत्वाखाली एक बहुरंगी तमाशा मंडळ कातोरे वाडी (देवठाण) तेथे कार्यरत होते. त्यांनी माझी चित्रकला बघुन माझा गुणगौरव सुध्दा केला होता "सुधाकर काय हुबे हुब चित्रा काढीथो" म्हणुन तमाशाचे एक चित्र बनवायला सांगितले होते.मला लाख लाख प्रयत्न करूनही मला काही ते चित्र काढायला जमत नव्हते कारण हा अवलीया दोन्हीं पायांनी अपंग होता आणि आंबू हा आव्वल एक नंबरचा ढोलक्या होता आणि त्याला दोन्ही पायांनी अपंग असल्या मुळे ऊभे राहून ढोलकी वाजवता येत नव्हती मला आठवतेय की काहीतरी एका लाकडी स्टूल वर ढोलकी आणी एका लाकडी स्टूल वर आंबु बसायचा नेमकी हीच ती अडचण यायची की स्टूल वर ढोलकी काढली की त्यांच्या मागे बसलेल्या स्टूल वर आंबू चे हूबे हुब चित्र मला जमलेच नाही बरे त्यातल्या त्यात ते ग्रुप चित्रं होते आणि माझी चित्रकला तशी तंतोतंत लागू होत नव्हती आणि खर सांगायचा तर मी पणं मुरलेला चित्रकार नव्हतोच आणि त्या काळी माझे कोणतेच चित्रकलेचे शिक्षण/प्रशिक्षण झालेले नव्हतेच. त्यावेळी कोणत्याही प्रकारची रूल फोटोग्राफी ची कला आवगत नव्हती किंवा जवळपास फोटो कोणीच काढतच नव्हते फोटो काढायचच ठरला तर फोटो स्टुडिओत जावे लागायचे.तो काळच असा होता की फोटो तंत्रज्ञान आजच्या इतके विकशीत झालेले नव्हते कोणी कोणत्याच प्रकारचे कॅमेरे वापरत नव्हते त्यामुळे शक्यतो कोणत्याही प्रकारचे फोटो काढलेच जात नव्हते कधीतरी कोठेतरी केंव्हातरी मोठी जत्रा आसेल तेव्हा यात्रेत दुकाणात लावून फोटो स्टुडिओ उभा असायचा त्यात (ब्लॅक अँड व्हाईट फोटो) फोटो काढायची सोय होती बऱ्याच लोकांकडे यात्रेतील फोटो असतीलही. अश्या प्रकारे मी एक चित्र काढायचा प्रयत्न केला पण हुबे हूब तंतोतंत जमले नाही किंबहुना त्यावेळी फोटो तंत्रज्ञान आजच्या सारखे विकसित असते तर कदाचित असते तर फोटो वरून फोटो रेखाटून एक चांगला पर्याय/फोटो काढता आला असतां खरोखर ही खंत मनात कायम स्वरुपी राहूनच गेली आहे. आंबू हा उत्कृष्ट ढोलकी वादक तर होताच होता पण उत्कृष्ट गायक सुध्दा होता,युगुल गीत,प्रेम गीत,विरह गीत,शौर्य,गीत,पोवाडा, चवली पावली, गण गौळण ,किंवा अनेक नॉन स्टॉप गाणे गायची सोबत ढोलकी सुध्दा तेव्हढ्याच तत्परतेने वाचवायची कुठेही सुरांचा बेसुर होऊ द्यायचा नाही संपूर्ण तमाशा कलाकारांच्या टीमला मार्गदर्शन दिग्दर्शन करायचे आशा या अवलिया कलाकाराची माहिती कीतीही सांगीतली तरी कमीच होईल मोठ्या गोष्टी कोणी वाचत नाही गायक म्हणून सवाल जबाब,कलगी तुरा, भेदिक, धार्मिक अध्यात्मिक कार्यक्रमांतील देवी देवतांची गीते गाणी खंडोबा, बहीरोबा, चेडोबा, वेताळ, चोखोबा, पांन्होबा, वाघोबा तसेच पशू पक्षी आणि बऱ्याच प्रकारची गाणे गायची पहाडी आवाजात सादर करण्यात निष्णात आणी तरबेज व्यक्तिमत्व आज हयात नाही पण त्यांची किर्ती कायम स्वरुपी स्मरणात राहील.आंबू सयाजी कातोरे यांच्या मृत्यू पच्छात मानाचा ठाकरी सलाम.जय आदिवासी! जय जोहार!जय राया ठाकर! अलीकडे अनेक फिल्म स्टार रील स्टार प्रचारक शोसल मीडिया वाले बातमी दार घरोघर तयार झाले असले तरी प्रत्यक्षात खरे स्टार अंधारातच आहेत. आदिवासीं संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आदिवासी अनुसूचित जमातीतील ठाकर समाजातील कै.अंबू सयाजी कातोरे यांची माहिती महाराष्ट्र शासना पर्यंत पोहचवावी आणी त्यांच्या परिवारातील वारस सदस्य म्हणून त्यांच्या पश्चात वारसांचा हयात त्यावेळच्या "तमाशा कलाकारांच्या टीमचा" यथोचित सत्कार गुणगौरव समारंभ आयोजित करावा.

**समाजसेवक**
**आदि. सुधाकर विठ्ठल मेंगाळ कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० मार्च २०२६


# महाड चवदार तळे सत्याग्रह : समतेच्या हक्कासाठीची जलक्रांती

**भा**रतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांनी केवळ एका प्रश्नाचे निराकरण केले नाही, तर संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या पाया हलवून टाकला. २० मार्च १९२७ रोजी घडलेला महाड चवदार तळे सत्याग्रह हा असा एक ऐतिहासिक टप्पा आहे, ज्याने भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या अमानुष प्रथेला उघडपणे आव्हान दिले आणि समानतेच्या लढ्याला एक नवीन दिशा दिली. हा सत्याग्रह पाण्यासारख्या मूलभूत हक्कासाठी होता, परंतु त्यामागे असलेली भावना ही मानवी सन्मान, स्वाभिमान आणि न्याय यांची होती. त्यामुळेच हा प्रसंग भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.ब्रिटिशकालीन भारतात जातिव्यवस्था अत्यंत कठोर स्वरूपात अस्तित्वात होती. समाजातील तथाकथित उच्चवर्णीयांनी स्वतःला श्रेष्ठ समजत खालच्या जातींना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवले होते. अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी जाण्याची, विहिरी किंवा तलावाचे पाणी वापरण्याची, शाळांमध्ये शिक्षण घेण्याची किंवा मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. पाणी ही जरी सर्वांसाठी समान असणारी नैसर्गिक संपत्ती असली तरीही त्या काळात त्यावरही जातीय बंधने घालण्यात आली होती. त्यामुळे पाण्याचा प्रश्न हा केवळ जीवनावश्यक गरजेचा प्रश्न नव्हता, तर तो सामाजिक प्रतिष्ठेचा आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न होता.याच अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अस्पृश्य समाजातील लोकांना शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आपल्या हक्कांसाठी लढण्याचे आवाहन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील वंचित घटकांनी स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहण्याचा निर्धार केला. महाड येथे असलेले चवदार तळे हे सार्वजनिक जलस्रोत असूनही अस्पृश्यांना त्याचा वापर करण्यास मनाई होती. १९२४ मध्ये महाड नगरपालिकेने सर्वांना या तळ्याचे पाणी वापरण्याचा अधिकार देणारा ठराव मंजूर केला होता, परंतु प्रत्यक्षात हा ठराव अंमलात आणला गेला नाही.या पार्श्वभूमीवर १९ आणि २० मार्च १९२७रोजी महाड येथे एक ऐतिहासिक परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला हजारो बहिष्कृत बांधव उपस्थित होते. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण अत्यंत प्रभावी होते. त्यांनी उपस्थितांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्पष्ट केले की, ‘आपण माणूस आहोत आणि माणूस म्हणून जगण्याचा आपला पूर्ण हक्क आहे.’ त्यांच्या या विचारांनी उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला.२० मार्च १९२७ रोजी हजारो लोकांनी एकत्र येऊन चवदार तळ्याकडे मोर्चा काढला. त्यांनी तळ्याचे पाणी प्राशन करून आपल्या हक्काची घोषणा केली. हा प्रसंग भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी क्षण होता. या कृतीमुळे अस्पृश्य समाजाने आपल्या हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती केली आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य दाखवले. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एक आंदोलन नव्हते, तर तो सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ होता.या घटनेनंतर समाजातील उच्चवर्णीय घटकांनी तीव्र विरोध दर्शवला. त्यांनी या कृतीचा निषेध केला आणि तळ्याचे ‘शुद्धीकरण’ करण्याचा प्रयत्न केला. या कृतीतून त्या काळातील सामाजिक मानसिकतेचे वास्तव स्पष्ट होते. तथापि, या विरोधामुळे चळवळीची तीव्रता कमी झाली नाही. उलट या घटनेने अस्पृश्य समाजात आत्मविश्वास वाढवला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्याचा निर्धार अधिक दृढ केला.महाड चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित नाही. या आंदोलनाने भारतीय समाजात समतेच्या विचारांना चालना दिली. या चळवळीच्या पुढील टप्प्यात २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले, ज्यामुळे सामाजिक विषमतेच्या विचारसरणीविरुद्ध एक ठोस संदेश दिला गेला. या घटनांनी भारतीय समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला बळ मिळाले.महाड सत्याग्रह हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. कारण या चळवळीने केवळ राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली नाही, तर सामाजिक स्वातंत्र्याचीही गरज अधोरेखित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, ‘राजकीय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही, जर समाजात समानता आणि न्याय नसेल.’ त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढे भारतीय संविधानाच्या निर्मितीत दिसून येतो.महाड चवदार तळे सत्याग्रहाने समाजातील वंचित घटकांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण केली. त्यांनी स्वतःला हीन समजण्याऐवजी स्वाभिमानाने जगण्याचा निर्धार केला. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न सुरू केले. या चळवळीने समाजातील इतर घटकांनाही विचार करण्यास भाग पाडले.आजच्या काळातही महाड सत्याग्रहाची प्रासंगिकता तितकीच आहे. जरी कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली असली तरी सामाजिक पातळीवर अजूनही भेदभावाच्या घटना घडतात. त्यामुळे या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करून आपण सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षण, जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी यांच्या माध्यमातून आपण हा लढा पुढे नेऊ शकतो.महाड चवदार तळे सत्याग्रह हा केवळ एक ऐतिहासिक प्रसंग नाही, तर तो मानवी हक्कांसाठीच्या संघर्षाची प्रेरणादायी कथा आहे. या आंदोलनाने आपल्याला शिकवले की, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करणे हीच खरी मानवता आहे.आज, २० मार्च या ऐतिहासिक क्रांती दिनानिमित्त आपण महाड चवदार तळे सत्याग्रह या घटनेचे स्मरण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करतो. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण समतेच्या, न्यायाच्या आणि बंधुत्वाच्या मूल्यांचे पालन करणे आवश्यक आहे.महाडचा हा सत्याग्रह भारतीय सामाजिक क्रांतीचा दीपस्तंभ आहे. त्याने आपल्याला दाखवून दिले की, बदल घडवून आणण्यासाठी धैर्य, संघटन आणि नेतृत्व आवश्यक असते. या घटनेचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे पुनरावलोकन नाही, तर भविष्यासाठी मार्गदर्शन आहे. चला, या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून आपण सर्वजण सामाजिक समतेसाठी कटिबद्ध होऊया आणि एक न्याय्य, समतावादी समाज निर्माण करूया.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

**लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत,**

**bagate.rajendra5@gmail.com**



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे शैक्षणिक क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या विविध संधी बाबतचे प्रदर्शन




**जालना:** उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे शैक्षणिक क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या विविध संधी बाबतचे प्रदर्शन दि. १८ मार्च रोजी बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. उच्च शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या विविध संधी व त्यांना शिक्षणक्रम पूर्ण करण्यात येणाऱ्या अडचणी यासंदर्भात शासन काय करत आहे या संदर्भातील माहिती या प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना दिल्या गेली. शिक्षण आणि रोजगार, डिजिटल प्रक्रिया, शैक्षणिक धोरण, विविध स्पर्धा परीक्षांची तयारी, शिष्यवृत्ती यासह विविध योजनांचे फलक महाविद्यालयात लावण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. महाविद्यालयातील शिक्षकांनी सुद्धा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले होते. उच्च शिक्षणाकरिता महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेले विविध उपक्रम या माध्यमातून प्रदर्शित केल्या गेले.


जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० मार्च २०२६


## हे नदी माय

हे नदी माय
तू फक्त नदी नाहीस
तर माय संस्कृतीची
अन् वाहक काळाची..
पर्वताच्या कुशीत जन्मलेली
लाडकी लेक धरती मातेची...

तुझ्या वाहत्या पाण्याला
लागलीय ओढ
समुद्राला भेटायची
म्हणून धावतेस अविरत
या जीवन प्रवासात..

हे नदी माय
तू माणसासारखीच
कधी शांत तर कधी उग्र..

कधी वाहते ओसंडून
अक्राळ विक्राळ रूप घेऊन
तर कधी चालते हळुवार
हृदयाच्या वेदना लपवून..

पण थांबत नाही तू
थांबून सडण्यापेक्षा
सडून मरण्यापेक्षा
वाहणं महत्त्वाचं
हे माहीत आहे तुला..

तुझ्या प्रत्येक वळणावर
विसावली एक कथा
माय बहिणीच्या दुःखाची..

तुझ्या प्रत्येक लाटेत
कुजबुज दडलीय काळाची
इतिहासातून न शिकलेल्या वर्तमानाची..

आता तुझ्या काठावर उभा राहून
मी शोधतोय मला
तुझ्या शांत प्रवाहात...

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# कृत्रिम बुद्धिमत्ता व बौद्धिक संपदा हक्कांवर एकदिवसीय कार्यशाळा व पोस्टर स्पर्धा उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभाग व सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने एम.ओ.यू. अंतर्गत आयोजित "एकदिवसीय कार्यशाळा व पोस्टर मेकिंग स्पर्धा" उत्साहात पार पडली. "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बौद्धिक संपदा हक्कांचे सामाजिक आयाम" या विषयावर आयोजित व्याख्यान हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला.या प्रसंगी सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप चौधरी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई या होत्या. यावेळी १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू असलेल्या शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सच्या प्रमाणपत्रांचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून श्री. मुरलीधर वर्मा व डॉ. प्रतिभा मनवर तसेच आयोजक प्राध्यापिका डॉ. आरती धनवे यांची उपस्थिती लाभली.आपल्या मार्गदर्शनात डॉ. संदीप चौधरी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ओरिजिनल इंटेलिजन्स (OI) यांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता व मौलिकता जोपासावी, असा संदेश दिला. मानवी मूल्यांची जपणूक आणि परस्पर सहकार्याची भावना अंगीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कॉपीराइट, पेटंट यांसारख्या बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.कार्यक्रमादरम्यान आयोजित पोस्टर मेकिंग स्पर्धेत कु. वैष्णवी महाले हिने प्रथम क्रमांक पटकावला, कु. प्रतीक्षा लिंभारे हिला द्वितीय क्रमांक मिळाला, तर कु. सपना राणी मलिक हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. अंजली उमाळकर व डॉ. नीता कळसकर यांनी केले.शॉर्ट टर्म कोर्सचे प्रमाणपत्र वितरण प्रमुख पाहुणे डॉ. संदीप चौधरी व प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक प्रा. मुरलीधर वर्मा व डॉ. प्रतिभा मनवर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थिनी कु. पायल शुक्ला, कु. राधिका दैठणकर व कु. सपना राणी मलिक यांनीही आपले अनुभव मांडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांनी विद्यार्थिनींना अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत समाजशास्त्र विभागाच्या उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आरती धनवे यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. सुजाता कणके यांनी करून दिला. आभार प्रदर्शन डॉ. वैशाली पाटील यांनी केले. सूत्रसंचालन कु. पायल शुक्ला व कु. अनुजा काळे यांनी केले.





